MHAM090027232022

खटला दाखल दिनांक – १३/१०/२०२२
खटला नोंदणी दिनांक – १३/१०/२०२२
खटला निकाल दिनांक – १६/१०/२०२३
खटल्याचा कालावधी – वर्ष म. दि.
०१ ०० ०३

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.४), चांदूर बाजार यांचे न्यायालयात**
**( पीठासीन अधिकारी – प्रियंका मोहनराव चव्हाण)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १६८७/२०२०** **निशाणी क्र. ०९ लगत**
(सीएनआर क्र. एमएचएएम०९–००२७२३–२०२०)

**गुन्हा रजिस्टर क्र. १८४/२०२२**

**फिर्यादी** : महाराष्ट्र शासन.

**प्रतिनिधीत्व** : श्री. आर.ए. कावरे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता

**आरोपी** : राहूल मनोहरराव वाटाणे
वय – ३५ वर्षे धंदा – मजुरी,
रा. मुकींदपुर, ता. अचलपुर, जि. अमरावती

**प्रतिनिधीत्व** : श्री. एन.एम. गोमकाळे

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २७/०९/२०२२ |
| खबर/फिर्याद नोंदणीचा दिनांक | : | २७/०९/२०२२ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | १३/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवण्याचा दिनांक | : | १४/१२/२०२२ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | : | १०/०३/२०२३ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याचा दिनांक | : | १६/१०/२०२३ |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६/१०/२०२३ |
| शिक्षा ठोठावण्याचा आदेशाचा दिनांक/ जर काही | : | काही नाही |

## आरोपीचा तपशील

| किती आरोपी | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | सोडल्याचा दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष / दोषी | दिलेली शिक्षा | संपरीक्षा चालू असतांना आरोपीला स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी –फौ.प्र.सं. चे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | राहूल मनोहराव वाटाणे | फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१–अ अन्वये नोटीस देवून सोडण्यात आले होते. | – | महाराष्ट्र प्रतिबंध कायदा कलम ८५ (१) (२) प्रमाणे | निर्दोष मुक्त करण्यात आले. | --- | --- |

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी**

**अ) अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| | | |
|---|---|---|
| १. | साक्षीदार क्र. १ मुरलीधर काशीराव वानखडे | पंच साक्षीदार |
| २. | साक्षीदार क्र. २ अक्षय भाऊराव वानखडे | पंच साक्षीदार |

**ब) बचावाचे साक्षीदार** – नाही.

**क) न्यायालयीन साक्षीदार** – नाही.

**अभियोगपक्ष /बचावपक्ष/ न्यायालयीन निशाणी**

**अ) अभियोग पक्ष न्यायालयीन निशाणी–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| १. | नि.क्र. १ | दोषारोप पत्र |
| २. | नि.क्र. २ | आरोपी तर्फे वकीलपत्र |
| ३. | नि.क्र. ०३ | जामीन अर्ज |
| ३. | नि.क्र. ०४ ते ०८ | जामीनाचे कागदपत्र |
| ४. | नि.क्र. ९ | आरोपीचे प्रतिकथन |
| ५. | नि.क्र. १० | पंच नामे मुरलीधर काशीराव वानखडे यांच्या सहीपुरता. |
| ६. | नि.क्र. ११ | पंच नामे अक्षय भाऊराव वानखडे यांच्या सहीपुरता. |

**ब) बचावपक्ष निशाणी – निशाणी काही नाही**

**क) न्यायालयातर्फे निशाणी – काही नाही.**

**ड) सामग्री वस्तु : – काही नाही.**

## न्यायनिर्णय
**(घोषित दिनांकः १६ ऑक्टोंबर, २०२३)**

आरोपीविरुध्द सदर खटला महाराष्ट्र प्रतिबंध कायदा कलम ८५(१)(२) अन्वये दाखल करण्यात आलेला आहे.

२. अभियोगपक्षातर्फे सरकारी वकील श्री. आर.ए. कावरे व आरोपीतर्फे वकील श्री. एन.एम. गोमकाळे यांचा युक्तिवाद ऐकला.

३. उभयपक्षाच्या परस्पर विधानांचा व उपलब्ध पुराव्याचा विचार करुन खालील प्रमाणे मुद्दे अधोरेखित करण्यात आले व त्यावर खालील नमुद कारणांसह निष्कर्ष पुढीलप्रमाणे देण्यात आला.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २७/०९/२०२२ रोजी ८.०० ते १४.०० वाजेच्या सुमारास अचलपुर तालुक्यातील मुकींदपुर येथे सार्वजनिक ठिकाणी आरोपी दारुच्या नशेत असभ्य वर्तवणुक करतांना व गावातील सार्वजनिक शांतता व सुव्यवस्थता भंग करतांना मिळून आला असे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | ...नाही. |
| २. | कोणता आदेश ? | ...आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

४. अभियोगपक्षातर्फे आरोपीविरुध्द ठेवलेला आरोप सिध्द करण्याकरीता पंच साक्षीदार मुरलीधर काशीराव वानखडे (सा. क्र. १) व अक्षय भाऊराव वानखडे (सा. क्र. २) यांना तपासण्यात आले. वारंवार संधी देऊनही अभियोगपक्ष उर्वरित साक्षीदारांना हजर ठेऊ शकले नाहीत म्हणुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळुन न आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अनुसार बयान नोंदविण्यात आलेले नाही.

**मुद्दा क्र.१ साठी** -

५. सदर घटनेतील पंच साक्षीदार मुरलीधर काशीराव वानखडे (सा. क्र. १) व अक्षय भाऊराव वानखडे (सा. क्र. २) यांच्या साक्षीत असे आले की ते आरोपीला ओळखत नाही. दि. २७.०९.२०२२ रोजी पोलीसांनी त्या दोघांना पंचनाम्याकरीता कुठेही बोलविले नव्हते. त्यांची फक्त एका कगदावर सही घेतली होती. पंचनामा कशा संदर्भात होता व त्यात

काय मजकूर लिहून आहे हे त्यांना माहित नाही. दोघांनीही अभियोगपक्षाच्या कथनाला समर्थन दिले नाही म्हणून अभियोगपक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली. परंतु त्यांनी त्यांच्या सही व्यतिरिक्त पंचानाम्यावरील मजकूर माहित नसल्याचे सांगितले. त्यामुळे पंच साक्षीदारांची साक्ष अभियोगपक्षाच्या खटल्याला पुरक ठरत नाही.

६. आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने हे सिध्द करणे आवश्यक होते की, दि. २७.०९.२०२२ रोजी आरोपी दारुच्या नशेत सार्वजनिक ठिकाणी असभ्य वर्तवणुक करत आहे. तसेच सार्वजनिक शांततेचा भंग करीत आहे. परंतु वारंवार समंस काढूनही अभियोगपक्ष फिर्यादी व तपासी अधिकारी अथवा ज्या वैदयकीय अधिका-यांने आरोपीची तपासणी केली होती त्यांना न्यायालयात साक्षकामी हजर ठेवण्यास असमर्थ ठरला. तसेच ज्या पोलीस अधिका-यासमोर घटनेचा पंचनामा करण्यात आला होता त्यालाही अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे सदर घटनेचा पंचनामा सिध्द झालेला नाही. सबब पुराव्याच्या अभावी आरोपी दारुच्या नशेत असभ्य वर्तवणुक करतांना मिळून आला हे सिध्द होत नाही. म्हणून आरोपी विरुध्द महाराष्ट्र प्रतिबंध कायदा कलम ८५ (१)(२) अन्वये ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द झालेला नाही. परिणामी मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी नोंदविण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र.२ साठी</u> -**

७. वरील विवेचनेच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी असल्याने आरोपीस निर्दोष मुक्त करणे उचित होईल. सबब, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| | **आदेश** |
| १. | आरोपी राहूल मनोहरराव वाटाणे याला महाराष्ट्र प्रतिबंध कायदा कलम ८५ (१)(२) च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व बंधपत्र रद्द करण्यात येतो. |
| ३. | आरोपीने कलम ४३७–अ फौजदारी प्रक्रिया संहितेच्या अंतर्गत सहा महिन्याच्या कालावधीकरीता रु. १५,०००/– चे वैयक्तिक जातमुचलक्याचे बंधपत्र द्यावे. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला). |
| | |

PRIYANKA MOHAN CHAVAN

Digitally signed by PRIYANKA MOHAN CHAVAN
Date: 2023.11.01 13:20:30 +0530

(प्रियंका मोहनराव चव्हाण)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.४), चांदूर बाजार .

दिनांक : १६/१०/२०२३.
स्थळ : चांदूर बाजार.